## पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८
## ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३
## कार्यपत्रिका क्र. ८
## सभावृत्तांत

दिनांक :- २१/१०/२०१५ वेळ :- दु. १२.१५ वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची मासिक सभा बुधवार दिनांक २१/१०/२०१५ रोजी दु. १२.१५ वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा. ॲड. चिंचवडे संदिप गुलाबराव - अध्यक्ष
२. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव
३. मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर
४. मा.शमीम पठाण
५. मा.को-हाळे अनंत सुभाष
६. मा.साबळे छाया जगन्नाथ
७. मा.जगताप विमलताई सुरेश
८. मा.पवार आप्पा उर्फ संपत ज्ञानोबा
९. मा.बारणे निलेश हिरामण
१०. मा.झामाबाई बाळासाहेब बारणे
११. मा.ओव्हाळ शेखर अशोक
१२. मा.पवार यमुनाताई रमणनाना
१३. मा.गायकवाड विनय उर्फ विनायक रमेश
१४. मा.कलाटे स्वाती मयूर
१५. मा.पाषाणकर गोरक्ष दशरथ स्वीकृत सदस्य

खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

मा.योगेश कडुसकर, - .क्षेत्रिय अधिकारी, मा.रविंद्र जाधव प्रशासन अधिकारी तथा सचिव सभाशाखा, मा.गटटुवार - कार्यकारी अभियंता, स्थापत्य विभाग, मा.शशिकांत मोरे, कार्यकारी अभियंता, विदयुत, मा.सी.एन.धानोरकर – उपअभियंता, स्थापत्य , मा.एन.आर.निंबाळकर – उपअभियंता स्थापत्य, मा.संध्या वाघ, उपअभियंता , स्थापत्य, मा.ए.बी.पाटील - उपअभियंता, विदयुत विभाग, मा.ग्वालवंशी एस.जे.- प्र.उपअभियंता, पाणीपुरवठा विभाग, श्रीम.पाठक ए.ए. - उपअभियंता, झोनिपु विभाग स्थापत्य, मा.मिनानाथ इनामदार – लेखाधिकारी, श्री.जी.एस.देशपांडे – मुख्य आरोग्य निरिक्षक,श्री.वामन बाबुराव नेमाणे – कार्यालयीन अधिक्षक (अतिक्रमण पथक प्रमुख) ब क्षेत्रीय कार्यालय इत्यादी.

सर्वप्रथम मा. सभाध्यक्ष ॲड. चिंचवडे संदिप गुलाबराव यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सभेचे कामकाजास सुरुवात केली.

अ) तदनंतर मागील कार्यपत्रिका क्र. ७, दि. १६/९/२०१५ रोजी झालेल्या सभेचा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.अध्यक्ष यांनी प्रकट केले.

**तदनंतर उपस्थित सन्मा. सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्रमांक ३ प्रभाग क्रमांक ५२ ताथवडे पुनावळे येथे ओव्हाळ कॉर्नर पासून पुढे जाणा-या वस्तीस दर्शिले वस्ती (दर्शिले मळा ) असे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे

विषय क्रमांक ४ क्षेत्रसभा कार्याध्यक्ष व उपाध्यक्ष नेमणुकीबाबतच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे

विषय क्रमांक ५ प्रभाग क्रमांक २० मध्ये बिजलीनगर येथील मनपाच्या खाजगी इमारतीतील दवाखान्यास कै.रामभाऊ सुर्यवंशी दवाखाना हे नामकरण करणेस व बिजलीनगर हनुमान स्वीट समोरील चौकास कै.रामभाऊ सुर्यवंशी चौक हा ठराव ( ठराव क्रमांक ४४ दिनांक १६/९/२०१५) रदद करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे

विषय क्रमांक.६ चिंचवड लिंकरोडची हिंदु स्मशानभुमी नियमानुसार खाजगी तत्वावर सह संस्था महर्षी वाल्मीकी स्वयंरोजगार सह संस्था यांना देखभाल दुरुस्ती साफसफाई करणेकामी ठेकेदार पध्दतीने (मुस्लीम व ख्रीश्चन ) स्मशानभुमी प्रमाणे प्रभागाच्या अखत्यारीत ११ महिन्याच्या कराराने देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे .

ठराव क्र. ५० विषय क्र. १
दि. २१/१०/२०१५ विभाग - स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक : मा. निलेश बारणे अनुमोदक: मा. स्वाती कलाटे

संदर्भ :- मा. झामाबाई बारणे यांचा दिनांक १७/६/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

विषय :- थेरगांव येथील स.नं.२२/५ मधील क्षेत्र १ हेक्टर ०० आर या मिळकतीचा आगाऊ ताबा पिंपरी चिंचवड मनपास अ, ब पत्राव्दारे ज्या जमीन मालकाच्या मालकीची जमीन त्यांनी आरक्षण क्रमांक ६२८ खेळाचे मैदानसाठी दिलेले आहे. सदर खेळाचे मैदानास कै.रामभाऊ मोरु बारणे व कै.बारकु मोरु बारणे असे नांव देवून नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेबाबत विचार करणे

विषय क्रमांक १ चा विचार जानेवारीच्या सभेचे वेळी करणेत यावा

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ५१ विषय क्र. २
दि. २१/१०/२०१५ विभाग -१. पाणीपुरवठा ब क्षेत्रीय कार्यालय
२. लेखा विभाग ब क्षेत्रीय कार्यालय
सुचक : मा. शमिम पठाण अनुमोदक: मा. सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

संदर्भ :- मा.क्षेत्रीय अधिकारी यांचा क्र.पापु/बक्षेका/कावि/६४५५/६०/२०१५, दिनांक १३/१०/२०१५ अन्वयेचा प्रस्ताव

सन २०१४-२०१५ चे सुधारीत व सन २०१५-२०१६ चे मुळ अंदाजपत्रकात पाणीपुरवठा किरकोळ दुरुस्ती या लेखाशिर्षावर अशा एकूण तरतुदी र.रु.१,००,००,०००/- इतकी आहे. सदर अंदाजपत्रक तयार करतांना अंदाजपत्रकामध्ये सर्व चालु निविदा कार्यवाही व नियोजित कामाचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे. सर्व प्रकारची नियोजित कामे अंदाजपत्रकात समाविष्ट व्हावीत यादृष्टीने बहुतांशी कामांना ३ लाख, ४ लाख, ५ लाख अशा तरतुद ठेवण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे चालु कामे , निविदा कार्यवाही कामे व प्राधान्याने करावयाची नियोजित कामे यांचा विचार करुन त्या त्या कामांना

अंदाजपत्रकानुसार या आर्थीक वर्षात आवश्यक तरतुद उपलब्ध करणेच्या दृष्टीने अंतर्गत बदल करुन तरतुद वर्ग करणेचा प्रस्ताव करणेत आलेला आहे.

सबब मा.प्रभाग समितीस मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्रमांक लेखा/अ.प./२७७८/२०१५ दिनांक २/१२/२००८ नुसार प्रदान केलेल्या अधिकारा अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०३ व अनुसुची प्रकरण ७ (२) मधील तरतुदींनुसार सदर प्रस्तावास व तसेच प्रपत्र अ मधील नमुद केलेल्या तरतुदी वर्ग करणेस मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता सदरची पुढील कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ५२ विषय क्र. ३

दि. २१/१०/२०१५ विभाग – स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय

सुचक : मा. शेखर ओव्हाळ अनुमोदक: मा.यमुनाताई पवार

संदर्भ :- मा. शेखर ओव्हाळ यांचा दि. २१/१०/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक ५२ ताथवडे पुनावळे येथील ओव्हाळ कॉर्नर पासून पुढे जाणा-या वस्तीस दर्शिले वस्ती (दर्शिले मळा) असे नामकरण करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे. सदर विषय कायम होणेची वाट न पहाता पुढील नियमाधीन कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ५३ विषय क्र. ४

दि. २१/१०/२०१५ विभाग - ब क्षेत्रीय कार्यालय प्रशासन विभाग

सुचक : मा.शमीम पठाण अनुमोदक: मा. शेखर ओव्हाळ

संदर्भ :- मा. ॲड. चिंचवडे संदिप गुलाबराव यांचा दि.२१/१०/२०१५ रोजीचा प्रस्ताव..

मा.आयुक्त यांचेकडील आदेश क्रमांक फक्षेका/सभा/कावि/१६३/२०१५, दिनांक १४/९/२०१५ नुसार प्रभाग निहाय क्षेत्र सभा घेण्याचे आदेश प्राप्त आहेत. सदर आदेशात नमुद केलेनुसार क्षेत्रसभेचा कार्याध्यक्ष त्या प्रभागातील जास्तीत जास्त सदस्यत्व कालावधी विचारात घेणेत येईल व दुसरा सदस्य उपाध्यक्ष राहील. त्याप्रमाणे ब क्षेत्रीय कार्यक्षेत्रातील प्रभाग निहाय क्षेत्रसभसाठी कार्याध्यक्ष व उपाध्यक्ष नियुक्ती करणे आवश्यक आहे. तरी ब प्रभाग समिती कार्यक्षेत्रातील एकूण ११ प्रभागात प्रभागनिहाय क्षेत्रसभा कार्याध्यक्ष व क्षेत्र सभा उपाध्यक्ष प्रभाग क्षेत्रसभेसाठी नियुक्ती करणेकामी प्रभाग निहाय क्षेत्रसभा कार्याध्यक्ष व उपाध्यक्ष यांची खालीलप्रमाणे नांवे निश्चीती व नियुक्तीकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे.

| **अ.क्र.** | **प्रभागाचा कमांक व नांव** | **प्रभाग क्षेत्रसभा कार्याध्यक्षांचे नांव** | **प्रभाग क्षेत्रसभा उपाध्यक्षांचे नांव** |
|---|---|---|---|
| १. | २० - चिंचवडेनगर | मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव | मा.सुर्यवंशी आशा ज्ञानेश्वर |
| २ | २१ - दळवीनगर | मा.शमिम पठाण | मा.लोंढे गणेश नारायण |
| ३ | २२- चिंचवडगांवठाण | मा.चिंचवडेपाटील आश्विनी गजानन | मा. ॲड..चिंचवडे संदिप गुलाबराव |
| ४ | २३- केशवनगर | मा.डोके अपर्णा निलेश | मा.को-हाळे अनंत सुभाष |
| ५ | २४ - रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह | मा.गावडे जयश्री वसंत | मा.शिंदे शितल उर्फ विजय गोरख |

| | | | |
|---|---|---|---|
| ६ | ४२ - भाटनगर | मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास | मा.साबळे छाया जगन्नाथ |
| ७ | ४९ - थेरगांव गावठाण | मा.विमलताई सुरेश जगताप | मा.आप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार |
| ८ | ५०-पदमजी पेपर मिल | मा.झामाबाई बाळासाहेब बारणे | मा.निलेश हिरामण बारणे |
| ९ | ५१ - बेलठिकानगर | मा.अप्पा उर्फ श्रीरंग चंदु बारणे | मा.माया संतोष बारणे |
| १० | ५२ - ताथवडे | मा.शेखर अशोक ओव्हाळ | मा.यमुनाताई रमणनाना पवार |
| ११ | ५३ - वाकड | मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड | मा.स्वाती मयुर कलाटे |

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ५४ विषय क्र. ५

दि. २१/१०/२०१५ विभाग – १. स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
२. वैदयकिय विभाग
३. भुमि आणि जिंदगी विभाग

सुचक : मा.आशा सुर्यवशी अनुमोदक: मा.भाऊसाहेब भोईर

संदर्भ :- मा. आशा सुर्यवंशी यांचा दिनांक २१/१०/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

प्रभाग क्रमांक २० मध्ये बिजलीनगर येथील दवाखान्यास (मनपाच्या कर्मचारी निवासस्थान इमारतीतील दवाखान्यास) कै.रामभाऊ सुर्यवंशी दवाखाना असे नामकरण करणेस व बिजलीनगर हनुमान स्वीट समोरील चौकास कै.रामभाऊ सुर्यवंशी चौक असा ठराव (मा.प्रभाग समितीतील सभा ठराव क्रमांक ४४, दिनांक १६/९/२०१५) रदद करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे..

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

ठराव क्र. ५५ विषय क्र. ६

दि. २१/१०/२०१५ विभाग – १.स्थापत्य ब क्षेत्रीय कार्यालय
२.आरोग्य /पाणीपुरवठा/विदयुत विभाग ब क्षेत्रीय कार्यालय
३. वैदयकिय विभाग (मुख्यालय)

सुचक : मा. शमीम पठाण अनुमोदक: मा. भाऊसाहेब भोईर

संदर्भ :- मा. शमीम पठाण यांचा दि.२०/१०/२०१५ रोजीचा प्रस्ताव.

चिंचवड लिंकरोडची हिंदु स्मशानभूमी नियमानुसार खाजगी तत्वावर सह संस्था महर्षी वाल्मीकी स्वयंरोजगार सह संस्था यांना देखभाल दुरुस्ती, साफसफाई करणेकामी ठेकेदार पध्दतीने (मुस्लीम व ख्रीश्चन ) स्मशानभूमीप्रमाणे देणेकामीचे प्रभागाच्या आखत्यारीत ११ (अकरा) महिन्याच्या कराराने देणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे. सदरचा सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता त्वरीत कार्यवाही करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे..

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

वरील प्रमाणे सभेचे कामकाज झाले मा. ॲड. चिंचवडे संदिप गुलाबराव यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

सही/-
[ॲड.चिंचवडे संदिप गुलाबराव ]
अध्यक्ष
ब प्रभाग समिती, चिंचवड

पिंपरी चिंचव महानगरपालिका,
ब प्रभाग कार्यालय, चिंचवड ३३
जा. क्र. बक्षे/सभाशाखा/२/कावि/ १८४ /२०१५.
दिनांक : २१ / ११ /२०१५

सही/-
प्रशासन अधिकारी तथा
सचिव( सभाशाखा )
ब प्रभाग समिती

प्रत -सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना